# <u>ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना</u>

१) संगणकीकृत प्रोग्रामद्वारे ऑनलाईन अर्जाची छाननी केली जाईल म्हणून ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने वाहनचालक पदासंबंधीची संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी. ऑनलाईन अर्ज हा इंग्रजी भाषेत भरला जाईल.

२) ऑनलाईन अर्जातील माहिती भरण्यापूर्वी उमेदवाराने नोंदणी शुल्क **₹ ५००/— 'SBI Collect'** द्वारे ऑनलाईन पेमेंट गेटवे (Payment Gateway) या सुविधेद्वारे ऑनलाईन शुल्क भरावे तद्नंतर **SB Collect Reference No.** प्राप्त होईल तद्नंतर ऑनलाईन अर्ज भरावा.

३) ऑनलाईन अर्ज हा शक्यतो वेब ब्राउझरच्या (Web Browsers) माध्यमातून संगणकावर भरावा.

४) ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती अचुक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

५) ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने स्वत:चा अद्यावत पासपोर्ट फोटो आणि स्वाक्षरी स्वतंत्र स्कॅन करुन **४०KB** पेक्षा कमी आकार होईल अशी **jpg /jpeg format** मध्ये दोन वेगवेगळया फाईल्स तयार ठेवाव्यात.

६) उमेदवाराने माहिती भरताना संपूर्ण नावाचे (spelling) त्याच्याजवळ उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कागदपत्रानुसार अचुक नमुद करावे.

७) उमेदवाराने पत्रव्यवहाराचा अचुक पत्ता पिनकोडसहीत द्यावा. अर्धवट पत्ता देऊ नये.

८) उमेदवाराने उपयोगात असलेलाच ईमेल आयडी (email ID) व मोबाईल क्रमांक द्यावा.

९) उमेदवाराने आपली जन्मतारीख, शैक्षणिक कागदपत्रे/ जन्मप्रमाणपत्राद्वारे अचुक लिहावी.

१०) उमेदवाराने स्वत:चा आधार कार्ड क्रमांक अचुक नमुद करावा.

...२/—

११) उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्जात अचूक शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती भरताना उमेदवाराने त्याची पात्रता खाली दिलेल्या क्रमानुसार नमूद करावी.

१. एस.एस.सी. (S.S.C.) किंवा तत्सम परीक्षा
२. एच.एस.सी. (H.S.C.) किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला.

(**नोंदः—** काही बोर्डाच्या गुणपत्रिका टक्केवारीऐवजी ग्रेडच्या स्वरुपात दिल्या जातात. या प्रकरणात, उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विषयनिहाय मिळालेले गुण, एकुण गुण आणि टक्केवारी असलेले गुणपत्रक संबंधित शाळा/बोर्डातून मिळवावे आणि ते गुण संबंधित रकान्यात दिलेल्या सूचनांनुसार भरावे.)

१२) उमेदवारास ज्या भाषांचे ज्ञान आहे ती भाषा निवड (select) करावी.

१३) उमेदवारास वाहन चालविण्याचा अनुभव असल्यास तो नमूद करावा.

१४) उमेदवाराने त्याच्याकडे असणाऱ्या वैध वाहन परवान्याची संपूर्ण व अचूक माहिती भरावी.

१५) उमेदवाराकडे वाहनांची देखभाल व किरकोळ दुरूस्तीचे ज्ञान/अनुभव असल्यास त्याबद्दलची माहिती भरावी.

१६) उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पुर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी तसेच न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास तसे अर्जात नमुद करावे. खरी माहिती दडवून ठेवल्यास उमेदवार नियुक्तीस अपात्र ठरेल. नियुक्तीनंतर सदर माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना न देता नोकरीवरुन कमी केले जाईल.

...३/—

१७) उमेदवाराने त्याला ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींकडून चांगली वर्तणूक व चारित्र्याबाबतचा दाखला (ऑनलाईन जाहिरातीसोबत जोडलेल्या **Form 'A'** नमुन्यात) प्राप्त करावा आणि अर्ज भरतांना सदरील व्यक्तींची माहिती अर्जात नमूद करावी. सदरील दाखला हा जाहिरात प्रसिध्दीनंतरच्या तारखेचा असावा. सदरील प्रतिष्ठित व्यक्ती ही उमेदवाराची जवळची नातेवाईक/मित्र नसावी.

१८) उमेदवाराने अर्जात योग्य त्या ठिकाणी, **४० KB** पेक्षा कमी आकार असलेल्या स्वतःच्या स्कॅन **फोटोची** jpg/jpeg format मधील फाईल Upload करावी. सदरील स्कॅन फोटो स्पष्ट दिसणारा असावा.

१९) उमेदवाराने अर्जात योग्य त्या ठिकाणी, **४० KB** पेक्षा कमी आकार असलेल्या स्वतःच्या स्कॅन **स्वाक्षरी** jpg /jpeg format मधील फाईल Upload करावी. सदरील स्कॅन स्वाक्षरी स्पष्ट दिसणारी असावी.

२०) अर्ज Submit करण्यापूर्वी उमेदवाराने भरलेला अर्ज बरोबर आहे याची खात्री करावी, Declaration चे वाचन करावे व नंतरच **I Agree** या बटणावर Click करावे. अर्ज **Submit** झाल्यावर उमेदवारास अर्जात कोणताही बदल करता येणार नाही.

२१) अर्ज Submit झाल्यानंतर येणारा **Registration ID Number** उमेदवाराने नमूद करुन घ्यावा आणि **Print Application** हा पर्याय (option) Select करुन ऑनलाईन अर्जाची Print out काढावी.

२२) सदरील Print out काढल्यानंतर शेवटी दिलेल्या जागेवर उमेदवाराने आपला स्वतःचा फोटो चिटकवावा आणि सोबतच्या रकान्यामध्ये **काळया** पेनाने स्वतःची सही करावी. सदरील Print out उमेदवाराने पुढील कार्यवाहीसाठी स्वतःजवळ जतन करुन ठेवावी.

**आदेशावरुन**

**सही/—**

**दिनांकः २१ एप्रिल, २०२५**

**महाप्रबंधक**

**मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार**